# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, जळगांव ४२५ ००२.

✆ ०२५७-२२८१५२२ (कार्या.) २२८१३१९ (फॅक्स)

Web : www.gcoej.ac.in Email : princoej@rediffmail.com


जा क्र शाअमज /लेखा/ २०२१/327 दिनांक- 11 FEB 2021

परिपत्रक -

**विषय - प्राप्तीकराचे विवरणपत्र भरुन सादर करणेबाबत....(वित्तीय वर्ष .२०२०.२१)**

संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचा-यांना कळविण्यात येते की, माहे फेब्रुवारी - २०२१ च्या वेतन देयकासोबत प्राप्तीकराचे विवरणपत्र जोडणे आवश्यक आहे. ती प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. सन २०२०-२१या वर्षासाठी आवश्यक असलेले आयकराबाबतचे दोन नमुने म्हणजेच (1) Old Regime (2)New Regime असे तयार करण्यात आले असून ते महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील Download section मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यापैकी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी आपल्या स्वत: ला जो नमुना लागु असेल त्याच नमुन्याचा उपयोग करावयाचा आहे. कोणत्याही परिस्थितीत दोन नमुने भरून द्यायचे नाही. तसेच कपात केलेल्या वेतनाबाबतच्या आदेशाची प्रत देखील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

तसेच असे कळविणेत येते की,जे अधिकारी/कर्मचारी संस्थेबाहेर संस्थांना (80Gअंतर्गत) डोनेशन/देणगी देणार असतील तर अशा देणगीचा विचार संस्थास्तरावरील आयकर विवरणपत्रात दर्शविण्यात येवू नये. ज्या अधिकारी कर्मचारी यांना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात फरकाची रक्कम प्राप्त झाली असेल ती रक्कम प्राप्त झाली असेल ती रक्कम आयकर विवरणपत्रासोबत जोडावयाचा वेतन विवरणपत्रात स्वतंत्रपणे (Arrears) म्हणून दर्शवावी .

वेतनाचे विवरणपत्र तयार करतेवेळी वर्ग १ च्या अधिकारी वर्गास मार्च २०२० चे ५० - ५०% मिळालेले वेतन एकत्रित दाखवावे तसेच वर्ग ३ च्या कर्मचा-यांनी ७५ % व २५ % असे दिलेले वेतन पूर्ण महीना घ्यावा असा एकत्रित दाखववावे.तसेच ज्या वर्ग -३ च्या कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नतीचा फरक देण्यात आला आहे त्याबाबतची माहीती कार्यालयातून घेण्यात यावी व सदरची विवरणपत्र ही यथावकाश देण्यात येईल.याची नोंद घ्यावी.

DCPSधारक अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की,आयकर विवरणपत्राच्या Old Regime या नमुन्यात १०%(रिबेट) सवलत मिळते व New Regime या नमुन्यात संबंधितांना १४ % (रिबेट)सवलत मिळते याबाबत नोंद घ्यावी.

वेतना व्यतीरिक्त मिळणा-या मानधनाबाबतची यादर देखिल वर नमुद केल्याप्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येइल यास्तव सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना कळविण्यात येते की वर नमुद केलेल्या सर्व सुचना विचारात घेवून सर्वांनी आयकर विवरणपत्र भरुन द्यावे. आयकर विवरणपत्रात दर्शविलेल्या प्रत्येक बचतीच्या कागदपत्रांच्या दोन प्रतीत संच तयार करून विवरणपत्रास जोडावे अपक्षित बचात असल्यास ३१ मार्च २०२१ पर्यंत करणार असल्यास त्याबाबतचे हमीपत्र जोडणे आनिवार्य आहे. तद्नंतर सदरची बचत त्याप्रमाणे करण्यात येईल. त्याची प्रत कार्यालयास न चुकता सादर करावी . अन्यथा ते From No 16 देतांना विचारात घेतले जाणार नाही. घरभाडे व सवलत घेझयाकरीता घरमालकाचा पॅन नंबर भाडेकरारपत्र व पावती (१२ महीन्याच्या )जोडण्यात याव्यात

सर्व अधिकारी /कर्मचारी यांनी उपरोक्त सुचनांप्रमाणे आयकर विवरणपत्र दिनांक २५/२/२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत कार्यालयास न चुकता सादर करावे जे अधिकारी कर्मचारी दिलेल्या मुदतीत विवरणपत्र जता करणार नाहीत त्यांचे माहे फेब्रुवारीचे वेतन हे नियमित वेतन देयकासोबत काढण्यात येणार नाही तसेच त्यांचे त्यानंतरचे देखिल वेतन काढता येणार नाही याची नोंद घ्यावी.

(डॉ. र.द.कोकाटे)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव

प्रत - १.सर्व विभागप्रमुखांना माहीती व पुढील कार्यवाहीस्तव.
२/- त्यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक त्यांनी आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून दयावे व कर्मचा-यांची स्वाक्षरी केलेली प्रत कार्यालयात जमा करावी.

२ श्री. आर.एल.वाणी , प्रयोगशाळा सहा.यांना माहीती व पुढील कार्यवाहीसाठी
२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संबंधितांनी सदरचे परिपत्रक त्यांनी आयकर विवरणपत्र तपासून स्वाक्षरीसाठी वरिष्ठांकडे सादर करावे

३.प्र. प्रबंधक/कार्यालय अधिक्षक यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी आयकर विवरणपत्र व्यसस्थित तपासून पुढील कार्यवाहीसाठी संबंधितांना द्यावे